आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -दुपारी ३.०० वाजता

३०ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी ७ हजार ९९५ उमेदवारांचे सुमारे ११ हजार अर्ज दाखल, आज अर्जांची छाननी

- आचारसंहिता लागू झाल्यानंतर कालपर्यंत आलेल्या तक्रारींपैकी ९९ टक्क्यापेक्षा जास्त तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली

- रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार भारताचा परकीय चलन साठा ६८८ अब्ज २७ कोटी अमेरिकी डॉलर्सवर

**आणि**

- जम्मू काश्मीरमध्ये काल झालेल्या अपघातात महाराष्ट्रातल्या दोन जणांचा मृत्यू, चार जखमी

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या २८८ विधानसभा मतदारसंघातल्या निवडणुकीसाठी विविध पक्षांच्या आणि अपक्ष अशा ७ हजार ९९५ उमेदवारांनी दहा हजार ९०५ अर्ज दाखल केले आहेत. या अर्जांची छाननी आज सुरु आहे. चार नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येतील. काल अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता, शेवटच्या दिवशीही अनेक उमेदवारांनी शक्तिप्रदर्शन करत आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. विधानसभेसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे, तर २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर होतील.

**<><><><><>**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यानंतर कालपर्यंत आलेल्या तक्रारींपैकी ९९ टक्क्यापेक्षा जास्त तक्रारी निवडणूक आयोगानं निकाली काढल्या आहेत. १५ ते २९ ऑक्टोबरपर्यंत सी-व्हिजिल ॲपवर एकूण १ हजार ६४८ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यातल्या १ हजार ६४६ तक्रारी निकाली काढल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली.

सी-व्हिजिल ॲपद्वारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथक चौकशी करुन योग्य ती कारवाई केली जाते.

**<><><><><>**

विधानसभा निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी केल्या जाणाऱ्या  कामातून आपल्याला वगळण्यात यावं, अशी भारतीय जीवन विमा- एलआयसीच्या कर्मचाऱ्यांनी केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयानं काल फेटाळून लावली. एलआयसीमधल्या ७० ते ८० टक्के कर्मचाऱ्यांना विधानसभा निवडणुकीची कामं लावण्यात आली आहेत. कर्मचारी निवडणुकीच्या कामात अडकल्यानं त्याचा दैनंदिन कामकाजावर परिणाम होत असल्याचं सांगत त्यांना निवडणुकीच्या कामातून मोकळं करावं, अशी याचिका कर्मचाऱ्यांनी दाखल केली होती. त्यावर काल सुटीकालीन खंडपीठाकडे सुनावणी झाली. त्यावेळी ही याचिका न्यायालयानं फेटाळून लावली.

**<><><><><>**

लातूर लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार, भाजपा नेते सुधाकर श्रृंगारे यांनी काल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. लातूरच्या विकासाला प्राधान्य देत, काँग्रेस पक्षाच्या

दूरदृष्टीवर विश्वास ठेवत आपण काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याचं श्रृंगारे यांनी सांगितलं. यावेळी काँग्रेस नेते अमित देशमुख, दिलीपराव देशमुख उपस्थित होते.

**<><><><><>**

धुळे ग्रामीण मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार कुणाल पाटील यांनी आज जाहिर सभा घेऊन प्रचाराची सुरुवात केली. यावेळी धुळे लोकसभेच्या खासदार शोभा बच्छाव आणि महंत श्री वैष्णवदासजी गुरु महादेवदासजी महाराज उपस्थित होते.

**<><><><><>**

अकोला जिल्ह्यात अनेक नाराज झालेल्या अनेक इच्छुक उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील राजकारण चांगलेच तापलं आहे. सर्वाधिक बंडखोर हे महायुतीमधले आहेत. तिसऱ्या आघाडीला नाराज इच्छुकांमुळे आता बळ आलं आहे. भाजपला सोडचिठ्ठी देत डॉ. अशोक ओळंबे हे बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षाकडून अकोला पश्चिममधून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. रवी राठी यांनीही भाजपला रामराम करत मूर्तीजापूर इथून प्रहार जनशक्ती पक्षातर्फे निवडणूक लढवणार आहेत. अकोला पश्चिममधून भाजपचे पाच वेळा नगरसेवक राहिलेले इच्छुक उमेदवार हरीश अलीमचंदानी आणि भाजपचे संजय बडोणे हे अपक्ष म्हणून निवडणूक लढवणार असल्यानं भाजपची डोकेदुखी वाढली आहे. महाविकास आघाडीतही कुरबुरी सुरू आहेत. त्यामुळे अनेकांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले आहेत.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीमध्ये मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी धाराशिव जिल्हा निवडणूक प्रशासनानं हाती घेतलेल्या उपक्रमांचा भाग म्हणून, आज शालेय

विद्यार्थ्यांनी शहरातून सायकल रॅली काढली. रॅलीतल्या बोलक्या बाहुल्यानं यावेळी नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन केलं. या रॅलीत जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह, शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **जालना आणि बीड** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व बँकेनं काल एप्रिल ते सप्टेंबर २०२४ या कालावधीसाठी परकीय चलन साठा व्यवस्थापनाबाबतचा ४३ वा अर्धवार्षिक अहवाल प्रकाशित केला. १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत भारताकडे एकूण ६८८ अब्ज २७ कोटी अमेरिकी डॉलर्स इतका परकीय चलन साठा असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २००४ मध्ये अर्धवार्षिक अहवालाचं संकलन आणि त्याचं सार्वजनिक स्वरूपात प्रसारण करण्याची प्रक्रिया सुरु केली होती. देशाच्या परकीय चलन साठ्याचं व्यवस्थापन अधिक पारदर्शक बनवणं, हे याचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये श्रीनगर इथं आज झालेल्या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले. हे सर्व प्रवासी महाराष्ट्राचे रहिवासी होते.

जखमींना बनिहाल इथं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मृतांची ओळख अद्याप पटली नाही.

<><><><><>

भारतीय रेल्वेनं स्वित्झर्लंडच्या पर्यावरण, वाहतूक आणि दळणवळण विभागाबरोबर सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे दोन्ही देशांमधल्या तांत्रिक सहकार्याला चालना मिळेल, तसंच भारतीय रेल्वेला तंत्रज्ञानाची देवाणघेवाण, ट्रॅक देखभाल, व्यवस्थापन आणि बांधकाम यासह विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य मिळेल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. हा सामंजस्य करार भारतीय रेल्वेचं आधुनिकीकरण करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेला अनुसरून असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

दिवाळी आणि छट पूजेच्या सणानिमित्त होणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता, भारतीय रेल्वेनं यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त, म्हणजेच अडीच हजारापेक्षा जास्त अतिरिक्त रेल्वे गाड्या सोडल्या आहेत.

सणासुदीच्या काळात यंदा विशेष रेल्वे गाड्यांची संख्या वाढवून ७ हजार करण्यात आल्याचं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतंच जाहीर केलं होतं. गेल्या वर्षी ही संख्या साडेचार हजार इतकी होती.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर असून आज संध्याकाळी ते एकता नगर इथं २८० कोटी रुपये खर्चाच्या विविध पायाभूत विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. त्यानंतर ते ‘आरंभ. ६’ अंतर्गत, प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांच्या तुकडीला संबोधित करतील. ‘आत्मनिर्भर आणि विकसित

भारतासाठी दिशादर्शक मार्ग’ ही यंदाच्या या कार्यक्रमाची संकल्पना आहे. उद्या, ३१ ऑक्टोबर रोजी प्रधानमंत्री राष्ट्रीय एकता दिनानिमित्त आयोजित समारंभात सहभागी होतील, आणि स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहतील.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर असून, काल ते रियाध इथं पोहोचले. रियाधमध्ये ते आठव्या ‘फ्युचर इन्व्हेस्टमेंट इनिशिएटिव्ह’, या भविष्यातल्या गुंतवणूक उपक्रमांबाबतच्या परिषदेत सहभागी होतील. गुंतवणूक क्षेत्रातले जागतिक धुरीण, गुंतवणूकदार आणि नवोन्मेषींना एकत्र आणणारं हे महत्वाचं व्यासपीठ आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात उल्हासनगर इथल्या ‘न्यू गजानन मार्केट’ परिसरात आज सकाळी एका कपड्याच्या दुकानात लागलेली आग आसपासच्या परिसरात पसरली. घटनास्थळी आगीचे बंब पोहोचले असून, बचाव कार्य सुरु आहे. आगीचं कारण अद्याप स्पष्ट नसल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

**<><><><><>**

युरोपिय राष्ट्रसंघानं चीननिर्मित इलेक्ट्रिक वाहनांवरचा कर येत्या पाच वर्षांसाठी ४५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रसेल्स आणि बिजींग दरम्यान झालेल्या वाटाघाटीत हा कर काढून टाकणं किंवा कमी करण्याबाबत चर्चा झाली. युरोपनं तीन प्रमुख चीनी इलेक्ट्रिक वाहनांचे ब्रँड एसएआय़सी, बीवायडी आणि गिली यांच्यावर वैयक्तिक कर लागू केला आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं काल महिला क्रिकेटची ताजी क्रमवारी जाहीर केली. यात भारताची अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्मा हीनं एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत, इंग्लंडच्या सोफी हीला मागे टाकत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. दीप्तीची ही कारकिर्दीतली सर्वोत्तम क्रमवारी ठरली आहे. अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीतही दीप्तीनं पाचव्या स्थानावरून चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे.

**//<><><><><>//**